नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २५/०४/२०२६ (शनिवार)

## बनावट परवाना तयार करून अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना ५ दिवस पोलीस कोठडी

पोलीस स्टेशन भिवापुर :— दिनांक २४/०४/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने मौजा भिवापुर हद्दीतील कारगाव रेल्वे परिसरात नाकाबंदी करीत अवैधरित्या रेती वाहतुक करणारा भारत बेंझ कंपनीचा १२ चक्का टिप्पर एम एच ४९ बी झेड १७१७ आणि त्याला स्कॉटींग करून पोलीस आणि महसुल विभागापासुन सावध करणारी हुडांई क्रेटा क्रं एम एच ४९ सी डी ४५७७ यांच्यावर कारवाई करत टिप्पर वाहन चालक आरोपी क्रं १) **कैसर अली रियाजउद्दीन अली,वय ४७ वर्षे, रा गरीब नवाज चौक, खरबी नागपुर** आणि हुडई क्रेटा क्र एम एच ४९ सीडी ४५७७ चा चालक आरोपी क्रं २) **मोहम्मद ईनाजुल उर्फ कल्लू खान, वय ३८ वर्षे, रा. रोशन बाग, खरबी** ,नागपुर यांना ताब्यात घेतले. टिप्पर वाहन चालका कडील रेती वाहतुकीचा परवाना बनावट असल्याचे आढळुन आले. चालकास अधिक विचारपुस केली असता मालक आरोपी क्रं २) **अजीज शेख रा. खरबी नागपुर** याचे सांगणेवरून बनावट परवान्यासह अवैधरित्या रेती वाहतुक करीत असल्याबाबत सांगितले.

पोलीसांनी पंचासमक्ष २ वाहन, रेती आणि मोबाईल असा एकुण किंमती ६१,४५,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करून तिन्ही आरोपी यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन भिवापुर येथे कलम ३०३(२),३१८(४), ३३६(३),४९,३(५) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम अन्वये, सहकलम १५ पर्यावरण संरक्षण अधी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. टिप्पर आणि क्रेटा वाहन

चालक यांना अटक करण्यात आली. मा. न्यायालयाने नमुद आरोपींचा ५ दिवस दिनांक २८/०४/२०२६ रोजी पर्यंत पोलीस कोठडी रिमांड मंजुर केला आहे.

## ३०४ ग्रॅम गांजा सह ०१ लाख ९६ हजार ८० रूपयांचा मुद्देमाल जप्त, आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद, आरोपीला अटक नागपूर ग्रामीण पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी :— दिनांक २३/०४/२०२६ रोजी अंमली पदार्थ विरोधी कारवाई पथक हे पथक नागपूर उपविभागात पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदाराने अंमली पदार्थ गांजा बाबत खात्रीशिर माहीती दिली. नमुद पथकाने सदर माहीती एमआयडीसी बोरी पोलीसांना देत संयुक्तरित्या कारवाई करत पेट्रोलींग केली असता पेट्रोलींग दरम्यान वार्ड क्र. ४, टाकळघाट ता. हिंगणा येथे **आरोपी नामे शकिल जब्बार शेख, वय ४५ वर्ष, रा. वार्ड क्र. ४, टाकळघाट, ता. हिंगणा** हा त्याचे घरासमोरील रोडवर होंडा कंपनीची मोपेड ॲक्टीव्हा वाहन क्र. एम एच—४०/बी व्ही — २५६९ वर जाताना दिसला. आरोपी शासकिय वाहन पाहुन संशयास्पदरित्या पळुन जावु लागल्याने पोलीसांचा संशय अधिक बळावल्याने त्याचा पाठलाग करुन नमुद आरोपीचा शिताफिने पाठलाग करून ताब्यात घेतले. पोलीसांनी पंचासमक्ष त्याची आणि त्याचेकडील कापडी पिशवीची झडती घेतली अंमली पदार्थ गांजा मिळुन आला.

**नमुद आरोपीच्या ताब्यातुन अंमली पदार्थ गांजा ३०४ ग्रॅम किंमती ६०८०/—रुपये , एका प्लास्टीक चुंगडीत ईलेक्ट्रीक वजन काटा व प्लास्टीक पाउच, सिलींग इलेक्ट्रीक मशिन, ०२ मोबाईल व रोख रक्कम १४,५००/—रूपये, होंडा कंपनीची मोपेड ॲक्टीव्हा वाहन क्र. एम एच—४०/बी व्ही — २५६९ किंमती ९०,०००/—रूपये असा एकुण १,९६,०८०/— रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.** नमुद प्रकरणी आरोपीविरूद्ध पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे कलम ८(क), २० (ब) (पप) (अ), २९ एन.डि.पि.एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे.साखळी पुरावे जोडुन पोलीस अधिक तपास करीत आहेत.



कारवाई करणारे पोलीस पथक जप्त मुद्देमालासह

## गोवंश जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
## २१ जनावरांची सुटका, कुही पोलसांची कामगिरी

पोलीस स्टेशन कुही:— दिनांक २५/०४/२०२६ रोजी कुही पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, सिल्ली शिवारात सिल्ली मुसळगाव रोडच्या बाजुला उभ्या असलेल्या आयसर ट्रक क्रं एम.एच ४० सि.टी ४१५१ या वाहनात अवैधरित्या गोवंश जनावरांची कत्तलीकरीता वाहतुक केली जात आहे. पोलीसांनी तात्काळ घटनास्थळावर जावुन बातमीची शाहनिशा केली असता आयसर ट्रक क्रं एम.एच ४० सि.टी ४१५१ याची **पंचासमक्ष तपासणी केली असता त्यामध्ये २१ गोवंश जनावरे मिळुन आले**.नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन,शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन अत्यंत निर्दयतेने वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. **आरोपी नामे १) मोहमद आसीम मोहमद सलीम कुरेशी, वय ३२ वर्षे, रा. विठ्ठल मंदीर**

जवळ, गांधी स्कुल जवळ,भाजी मंडी कामठी जि. नागपूर, २) मोहम्मद मैफुज कुरेशी, वय ३२ वर्षे, रा. पापा खानच्या बगीचा जवळ कोळसा टॉल कांमठी जि. नागपूर ३) दामा जगन लांजेवार, वय ४५ वर्षे, रा. वार्ड क्र १ सिल्ली ता.कुही, जि.नागपूर ४) (वाहन चालक/मालक ) अनवर शब्बीर अली, वय ४६ वर्षे, रा. चौधरी मज्जीत जवळ,भाजी मंडी कामठी,ता. कामठी जि. नागपूर हे मिळुन आले. आरोपी क्रं ५) अतुल भिवा लांजेवार, वय ३० वर्ष, रा.सिल्ली ता.कुही जि नागपुर हा घटनास्थळावरून पळुन गेला. सर्व आरोपी हे संगणमताने अवैधरित्या कत्तलीकरीता जनावरांची वाहतुक करीत असल्याची माहीती प्राप्त झाली.

पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून १)२१ नग बैल किंमती. ५,५०,०००/— रूपये २) आयसर ट्रक क्र—एम.एच ४० सि.टी ४१५१ किंमती. ३५,००,०००/— रूपये व आरोपी यांचे ताब्यातुन ३) चार वेगवेगळया कंपणीचे मोबाईल किंमती ४०,०००/— रूपये असा एकुण ४०,९०,०००/— रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे. सुटका केलेल्या गोवंश जनावरांना पालन पोषणाच्या दृष्टीकोणातुन उज्ज्वला गौरंक्षण बहादुरा नागुपर येथे दाखल करण्यात आले आहे. नमुद आरोपी विरूध्द पोलीस स्टेशन कुही येथे कलम ५ अ(१),५(ब),९,११ महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधि, सहकलम ११(१), ११ (१) (ड), ११(१)(ई), ११(१)(एफ) प्राण्यांना निर्दयतेने वागवणे प्रति अधि. १९६०,सहकलम ३(५) भान्यासं प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## अवैधरित्या धारदार शस्त्र बाळगणाऱ्या अरोपीविरूध्द गुन्हा नोंद, रामटेक पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन रामटेक :— दिनांक २४/०४/२०२६ रोजी रामटेक पोलीसांना गोपनिय माहीती मिळाली की, मनसर माईन ग्राउंड येथे एक इसम हातात तलवार घेवुन कोणतातरी हस्तक्षेपनीय गुन्हा करण्याचे उद्‌देशाने फिरत आहे. नमुद माहीती प्राप्त होताच रामटेक पोलीसांनी मनसर माईन ग्राउंड येथे तात्काळ जावुन शाहनिशा असता एक इसम हातात तलवार घेवुन संशयास्पदरीत्या फिरताना दिसुन आला. पोलीसांनी त्याला विचारणा केली असता उडवाउडविचे उत्तर दिले. त्याच्या वरील संशय अधिक बळावल्याने त्यास

ताब्यात घेवुन नाव पत्ता विचारले असता **आरोपी इकबाल इसराईल पठाण, वय ३६ वर्ष, रा. मनसर माइन रामटेक, जि नागपुर** अशी माहीती पोलीसांना प्राप्त झाली.

**पोलीसांनी पंचासमक्ष** आरोपीचे ताब्यातून एक लोखंडी तलवार किंमती २५०/—रूपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे. **नमुद प्रकरणी आरोपीविरूद्ध पोस्टे रामटेक येथे कलम ४/२५ शस्त्र अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.**

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध १० गुन्हे नोंद

दिनांक २४/०४/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू असा एकुण ४९८०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण १० गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन कन्हान** येथे महिला आरोपी हिचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन सावनेर** येथे महिला आरोपी हिचेवर गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन खापा** येथे आरोपी नामे अरविद यादोराव खोब्रागडे, वय ५२ वर्ष, रा. नागलवाडी याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन काटोल** येथे १) गणेश रामाजी उईके, वय ३६ वर्ष, रा. रामदेवबाबा आयुडिपी काटोल, ह.मु. वार्ड क्र. ३, प्रेमनगर काटोल २) ०२ महिला आरोपी यांचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे आरोपी १) प्रमोद चितामन सातपुते, वय ४९ वर्ष, रा. नारसिंगी, ता. नरखेड २) अनिल प्रल्हादराव शेंबेकर, रा. जलालखेडा, ता. नरखेड यांचेवर प्रत्येकी १ असे ०२ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन पारशिवनी येथे आरोपी नामे १) प्रविण ईश्वर मरसकोल्हे, वय २५ वर्ष, रा. बनेरा, त. पारशिवनी २) रजत मोरेश्वर चंदनकर, वय ३० वर्ष, रा. ईटगाव, ता. पारशिवनी, जि. नागपूर यांचेवर प्रत्येकी १ असे ०२ गुन्हे नोंद आहे. **पोलीस स्टेशन उमरेड** येथे आरोपी नामे १) प्रमोद गनपत तिजारे, वय ३८ वर्ष, रा. तळोदी, उमरेड २) प्रभु राजेराम मांढरे, रा. ब्राम्हनी उमरेड याचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद आहे.

नमुद कारवाईत एकुण १) २१ लिटर मोहाफुल गावठी दारू २) ६४८० मिली देशी दारू असा एकुण ४९८०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.

## अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ०४ आरोपीतांविरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये गुन्हा नोंद

दिनांक २४/०४/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयात अंमली पदार्थाचे सेवन करणारे आरोपीतांवर खालील प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

पोलीस स्टेशन सावनेर अंतर्गत आरोपी शेख मिरू शेख पिरू खान, वय ६० वर्षे, रा. वार्ड क्र ०१, पाटणसावंगी सावनेर, जि. नागपूर हा पोळा मैदान पाटणसावंगी शिवार येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. तसेच पोलीस स्टेशन नरखेड अंतर्गत मौजा पिपळा केवळराम शिवार तसेच मौजा मोवाड शिवार येथे नरखेड पोलीस पेट्रोलींग करीत असतांना आरोपी १) किसना हिरामण चरपे, वय ५८ वर्ष, रा. पिपळा केवळराम, ता. नरखेड २) गुलाब राधे देशमुख, वय ७० वर्ष, रा. पिवळया शाळेजवळ मोवाड हे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले. **पोलीस स्टेशन वडोदा** अंतर्गत हल्दीराम कंपनी गुमथळा येथे वडोदा पोलीस पेट्रोलींग करीत असतांना **आरोपी** जगत विष्णु निपाने, वय ३६ वर्ष, रा. ह. मु. गुमथळा, ता. कामठी, जि नागपूर हा सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. नमुद आरोपींवर कलम २७ एन.डी.पी.एस. कायदयान्वये ०४ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

## नागपुर ग्रामीण जिल्हयातील ७२७ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक २५/०४/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २२ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ७२७ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे ३६ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३३ आरोपी अशा एकुण ९९ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ३८ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २६ आणि पोलीस स्टेशन वेलतुर ३१ आरोपी अशा एकुण १२५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग** :— सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ३१ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३७ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २९ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३० आरोपी अशा एकुण १२७ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३५ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे १८ आरोपी पोलीस स्टेशन वडोदा येथे १३ आरोपी अशा एकुण ६६ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग** :— रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ५४ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३३ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २९ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे २३ आरोपी अशा एकुण १३९ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग** :— काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ६६ आरोपी, पोलीस स्टेशन कोंढाळी येथे २८ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ४४ आरोपी

आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३३ आरोपी अशा एकुण १७१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**(सर्व ६ उपविभागातील सर्व २२ पोलीस स्टेशन येथे एकुण ७२७ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे. )**



मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने